अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ५० बेड आरक्षित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहामधील कोरोना केअर सेंटरमध्ये विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक अधिकारी, सेवक व त्यांच्या कुटुंबीयांकरिता ५० बेड आरक्षित करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे कळविले आहे. आवश्यकतेनुसार बेड उपलब्ध असल्यास प्राधान्याने विद्यापीठ कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्याच्या निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरून काही उपाययोजना व सूचनांचे पालन करण्यासंदर्भात

'त्यांची' सेवा पुढील आदेश होईपर्यंत बंद

विद्यापीठ अधिविभाग व प्रशासकीय विभागातील कार्यरत सर्व रोजंदारी, हंगामी सेवक व एकत्रित मानधनावर नियुक्त सेवक, पेजबेसीस व इतर सेवकांची सेवा पुढील आदेश होईपर्यंत बंद करण्यात यावी, असे कुलसचिवांच्या परिपत्रकात म्हटले आहे.

शिवाजी विद्यापीठातून...

विद्यापीठाने बुधवारी परिपत्रक काढले आहे. कार्यालयात उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मास्कचा वापर करावा. सामाजिक अंतर राखणे, सॅनिटायझरचा वापर करणे गरजेचे आहे. कार्यालयीन उपस्थितीबाबत योग्य ते नियोजन करावे. ऑनलाईन पद्धतीने, वर्क फ्रॉम होम कार्यालयीन कामकाज करण्याचा प्रयत्न करावा. अत्यावश्यक सेवा प्रदान करणाऱ्या विभागांची सेवा व्यवस्थित सुरू राहील याची दक्षता घ्यावी, असे कुलसचिवांनी परिपत्रकात म्हटले आहे.

ऑनलाईन व्याख्यानमाला आजपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभाग, कौशल्ये व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने सोमवार (दि. १०) पासून सायंकाळी ५ ते ६ या वेळेत ज्येष्ठ नागरिकांसाठी ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. १० रोजी डॉ. नवनाथ तुपे-पुणे व प्रा. डॉ. ए. ए. गुरव 'निराधार ज्येष्ठनागरिकांच्या समस्या'; दि. ११ रोजी ना. ना. इंगळे, अकोला 'ज्येष्ठनागरिक संघ, संघटना यांना तर अरविंद पालके 'आरोग्य व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करतील. दि. १२ रोजी अरुण रोडे, पुणे 'ज्येष्ठ नागरिक : केंद्र व राज्य शासनाचे धोरण या विषयावर व प्राचार्य डॉ. श्रीधर हेरवाडे 'प्रौढत्वी नीजशैशवास जपणे' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. दि. १३ रोजी ज्येष्ठ नागरिकांना सहकार्य व अभिवाचन याबाबत प्रकाश बोरगावकर व टी. आर. गुरव मार्गदर्शन करतील. दि. १४ रोजी 'ज्येष्ठनागरिकांचे बदलत्या काळातील कुटुंबातील स्थान' विषयावर डॉ. धनंजय लोखंडे व प्रा. डॉ. ए. एम. गुरव मार्गदर्शन करणार आहेत.

आजपासून ऑनलाईन समुपदेशन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभाग, कौशल्ये व उद्योजकता विकास केंद्रातर्फे कोरोना संकट काळात समाजातील विविध घटकांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची प्राथमिक काळजी घेण्यासाठी सोमवार, दि. १० पासून पाच दिवस सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत नागरिकांचे ऑनलाईन समुपदेशन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सध्या कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे दिवसेंदिवस कोरोना रुग्णांची संख्या वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठातर्फे ऑनलाईन समुपदेशन करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

अरविंद पालके - ॲक्युप्रेशर, डॉ. श्वेतलिना पाटील - योग व निसर्गोपचार, डॉ. नीलम मोरे - आहार, टी. आर. गुरव - समुपदेशन, डॉ. अमोल मिणचेकर - मानशास्त्र मार्गदर्शन, महेश चव्हाण - मानसिक संतुलन, प्रा. डॉ. ए. एम. गुरव - ताणतणाव व्यवस्थापन, प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव - नेतृत्व विकास याबाबत ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत. ऑनलाईन मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.